## संपादकीय...

# लोकशाहीचा उत्सव की मतदारांच्या अधिकाराची गळचेपी?

महाराष्ट्रात गेल्या तीन वर्षांपासून प्रलंबित असलेल्या महानगरपालिका निवडणुकांचे पडघम वाजू लागले आहेत. प्रशासकाच्या काळात थांबलेली विकासकामे आणि स्थानिक प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी राजकीय पक्षांसह सामान्य जनताही या निवडणुकांची चातकासारखी वाट पाहत होती.निवडणूक जाहीर होताच प्रत्येक पक्षाचा कार्यकर्ता आणि नेता नगरसेवक होण्याचे स्वप्न उराशी बाळगून मैदानात उतरला आहे. मात्र,या धामधुमीत एका महानगरपालिकेत चक्क १५ नगरसेवक बिनविरोध निवडून आल्याची धक्कादायक बातमी समोर आली आणि लोकशाहीच्या वर्तुळात चर्चेला उधाण आले.जिथे एका जागेसाठी डझनावारी उमेदवार इच्छुक असतात,तिथे इतक्या मोठ्या संख्येने बिनविरोध निवड होणे ही 'राजकीय किमया' आहे की 'नियोजित खेळी', असा प्रश्न आता सामान्य नागरिक विचारू लागला आहे. निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यापूर्वीच सर्वच राजकीय पक्षांत मोठी उलथापालथ पाहायला मिळाली.अनेक पक्षांनी वर्षानुवर्षे सतरंज्या उचलणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलून इतर पक्षांतून आलेल्या 'आयारामांना' उमेदवारी दिली. स्वतःच्या कार्यकर्त्यांवर विश्वास नसल्याने किंवा निवडून येण्याच्या क्षमतेच्या नावाखाली अनेक पक्षांनी बाहेरच्या नेत्यांना पक्षात प्रवेश देऊन उमेदवारी जाहीर केली.परिणामी,अनेक ठिकाणी निष्ठावंतांमध्ये असंतोष निर्माण झाला आणि त्यांनी बंडखोरी करत अपक्ष लढण्याचा निर्धार केला. काही ठिकाणी पक्षनेत्यांनी ही बंडखोरी शमवण्याचा प्रयत्न केला,पण अनेक उमेदवार प्रचाराच्या मैदानात ठाम राहिले.अशा अटीतटीच्या परिस्थितीत अचानक १५ जागांवर 'बिनविरोध' निवडीचा निकाल लागणे हे अनाकलनीय वाटते.

या बिनविरोध निवडीमागे दिलेले तांत्रिक कारण म्हणजे 'प्रतिस्पर्धी उमेदवारांचे अर्ज बाद होणे'.पण येथेच मुख्य संशय निर्माण होतो.गेल्या ३ वर्षांपासून निवडणुकीसाठी तयारी करणारे,वॉर्डाचा अभ्यास करणारे अनुभवी उमेदवार अर्जासोबत लागणारी कागदपत्रे जोडण्यात किंवा अर्ज भरण्यात इतकी मोठी चूक कशी काय करू शकतात? एखाद्या वॉर्डात एक-दोन उमेदवारांचे अर्ज बाद होणे समजू शकते, परंतु सर्वच्या सर्व प्रतिस्पर्ध्यांचे अर्ज बाद होऊन केवळ एकाच विशिष्ट पक्षाचे अर्ज तांत्रिकदृष्ट्या अचूक कसे ठरतात,यावर गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. हा निव्वळ योगायोग आहे की एखादी 'अर्थपूर्ण' तडजोड, याची शंका मतदारांच्या मनात येणे स्वाभाविक आहे.येथे सर्वात महत्त्वाचा मुद्दा लोकशाहीने दिलेल्या 'नोटा' (छजढ-) अधिकाराचा आहे.भारतीय लोकशाहीने मतदारांना एकही उमेदवार मान्य नसेल तर 'यांपैकी कोणीही नाही' (छेपश जष ढहश -लेींश) हे बटण दाबण्याचा अधिकार दिला आहे. जेव्हा निवडणूक आयोग केवळ अर्ज बाद झाले म्हणून एखाद्याला बिनविरोध विजयी घोषित करतो, तेव्हा त्या वॉर्डातील हजारो मतदारांचा हा 'नोटा' वापरण्याचा अधिकार नकळत हिरावून घेतला जातो.प्रतिस्पर्धी उमेदवार रिंगणात नसला तरी, संबंधित उमेदवाराला लोकांच्या कौलाला सामोरे जाण्याची संधी द्यायला हवी होती. ज्या उमेदवाराचा अर्ज वैध ठरला आहे, तो जनतेला आपला लोकप्रतिनिधी म्हणून खरोखर मान्य आहे की नाही, हे केवळ मतदानातूनच स्पष्ट होऊ शकते. बिनविरोध निवडीमुळे मतदारांना मतदान केंद्रापर्यंत जाण्याची आणि आपले मत नोंदवण्याची संधीच मिळत नाही.यामुळे लोकशाहीतील लोकांचा प्रत्यक्ष सहभाग संपुष्टात येतो.निवडणूक आयोगाने केवळ तांत्रिक नियमांवर बोट न ठेवता,लोकशाहीचे पावित्र्य जपण्यासाठी अशा परिस्थितीतही मतदान प्रक्रिया राबवण्याबाबत विचार करायला हवा.खरी लोकशाही तेव्हाच जिवंत राहील, जेव्हा प्रतिनिधी हा लोकांच्या 'मतातून' आणि 'बहुमताने' निवडून येईल. केवळ प्रतिस्पर्ध्यांचे अर्ज बाद झाले म्हणून विजयाचा गुलाल उधळणे, ही जनतेच्या लोकशाही अधिकाराची एकप्रकारे गळचेपीच आहे.

# पैशांचा खेळ आणि सत्तेचा वापर करून उमेदवार बिनविरोध : ही मतदारांची फसवणूकच!

लोकशाही ही केवळ मतदानाची प्रक्रिया नाही; ती जनतेच्या इच्छेचा, विचारांचा आणि पर्याय निवडण्याच्या अधिकाराचा उत्सव आहे. मात्र अलिकडच्या काळात पैशांचा खेळ, सत्तेचा दुरुपयोग आणि दबावतंत्र यांच्या जोरावर उमेदवार बिनविरोध निवडून आणण्याचे जे प्रकार वाढत आहेत, ते या लोकशाहीच्या मुळावरच घाव घालणारे आहेत. बिनविरोध निवड म्हणजे लोकशाही यश नव्हे, तर अनेकदा ती मतदारांच्या हक्कांवर टाकलेली गदा ठरते. कागदोपत्री बिनविरोध निवड ही कायदेशीर प्रक्रिया असली, तरी तिच्यामागील वास्तव अनेकदा अस्वस्थ करणारे असते. विरोधी उमेदवारांना उमेदवारी अर्ज भरूच न देणे, दबाव टाकणे, आर्थिक प्रलोभने दाखवणे, सत्तेची भीती निर्माण करणे, या सर्व मार्गांनी स्पर्धाच संपवली जाते. अशा वेळी मतदाराला मतदानाचा हक्क मिळतोच कुठे? निवडणूक न होता सत्ता हस्तगत केली जाते, ही वस्तुस्थिती लोकशाहीच्या आत्म्यालाच छेद देणारी आहे.

लोकशाहीत निवडणूक ही स्पर्धेची प्रक्रिया आहे. विचारांची, कार्यक्रमांची, धोरणांची आणि नेतृत्वगुणांची तुलना करण्याचा तो एकमेव मार्ग आहे. मात्र बिनविरोध निवडींच्या नावाखाली ही तुलना टाळली जाते. पैसा आणि सत्ता यांच्यापुढे सामान्य नागरिकाचा आवाज गुदमरतो. मतदाराला विचारण्याआधीच निर्णय घेतला जातो. ही प्रक्रिया म्हणजे लोकशाहीचे औपचारिकीकरण आणि लोकशक्तीचे हत्यारांतर होय. आज स्थानिक स्वराज्य संस्था असोत वा इतर निवडणुका बिनविरोध निवडींचे प्रमाण वाढत चालले आहे. यामागे एकमत, संमती, शांतता असे गोंडस शब्द वापरले जात असले, तरी प्रत्यक्षात ही शांतता दडपशाहीतून निर्माण झालेली असते. विरोधी मत मांडण्याचे धाडसही अनेकांना करता येत नाही, ही खरी शोकांतिका आहे. पैसा बोलतो, सत्ता धमकावते आणि लोकशाही गप्प बसते. हे चित्र केवळ राजकीय पक्षांचे अपयश नाही, तर समाजाच्या सामूहिक संवेदनशून्यतेचेही द्योतक आहे. लोकशाही ही मागून मिळणारी देणगी नसून, पुढे जाऊन मिळवायची जबाबदारी आहे. मतदार जर बिनविरोध म्हणजे चांगले असे मानू लागला, तर तो स्वतःच आपल्या अधिकारांवर पाणी सोडतो आहे, हे लक्षात घ्यायला हवे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाहीला केवळ राज्यपद्धती नव्हे, तर जीवनपद्धती मानले. या जीवनपद्धतीत मतभेद, विरोध आणि पर्याय यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. जिथे विरोध संपवला जातो, तिथे लोकशाही संपते आणि एकाधिकारशाहीची बीजे रोवली जातात. बिनविरोध निवडींचा अतिरेक हीच बीजे रुजवतो आहे. निवडणूक आयोग, प्रशासन आणि राजकीय पक्ष यांनीही आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. बिनविरोध निवडी हा अभिमानाचा विषय न मानता, अपवाद म्हणून पाहिले गेले पाहिजे. मुक्त, निर्भय आणि पारदर्शक निवडणूक प्रक्रिया सुनिश्चित करणे ही केवळ घटनात्मक जबाबदारी नाही, तर लोकशाही टिकवण्याची अट आहे. मतदारांनीही जागे होणे गरजेचे आहे. निवड करण्याचा अधिकार हा लोकशाहीचा गाभा आहे. तो हिरावून घेतला जात असेल, तर ती शांततेने स्वीकारण्याची बाब नाही. पैसा आणि सत्तेच्या जोरावर उभे राहणारे बिनविरोध उमेदवार लोकप्रतिनिधी नसून, लोकशाहीच्या पोकळपणाचे प्रतीक ठरतात. लोकशाही ही संघर्षातून घडलेली व्यवस्था आहे. ती टिकवायची असेल, तर संघर्षाची तयारीही ठेवावी लागते, विचारांचा संघर्ष, मतांचा संघर्ष आणि अन्यायाविरुद्धचा संघर्ष. बिनविरोध निवडींच्या नावाखाली जर हा संघर्ष संपवला जात असेल, तर तो लोकशाहीचा विजय नव्हे, तर पराभव आहे.

आज प्रश्न साधा आहे, आपल्याला मतदार हवेत की फक्त आकडे? निवडणूक हवी की केवळ घोषणा? जर उत्तर लोकशाहीच्या बाजूने असेल, तर पैशांचा खेळ आणि सत्तेच्या जोरावर घडवली जाणारी बिनविरोध निवड ही मतदारांची फसवणूक आहे, हे ठामपणे सांगावेच लागेल. लोकशाही टिकवायची असेल, तर निवडणूक ही स्पर्धा म्हणूनच झाली पाहिजे. अन्यथा उद्या मतदान केंद्रे उघडी राहतील, पण लोकशाही आतून केव्हाच बंद झालेली असेल. मुंबईत उमेदवारी मागे न घेतल्यास धमकी देऊन विरोधी उमेदवारांना मैदानातून हुसकावून लावले आणि त्यानंतर सत्ताधारी पक्षाच्या उमेदवाराचा बिनविरोध विजय साजरा करत बॅनर, पोस्टर झडकवले, ही घटना लोकशाहीच्या इतिहासात काळ्या अक्षरांनी नोंदवावी अशी आहे. हा विजय नसून धाक, धमकी आणि दहशतीवर उभारलेली सत्ता आहे. निवडणूक न होता विजयाचे जल्लोष करणे म्हणजे मतदारांच्या तोंडावर तमाचा मारण्यासारखे आहे. मत मांडण्याचा, निवडणूक लढवण्याचा आणि पर्याय देण्याचा हक्क जर धमकीच्या जोरावर हिरावून घेतला जात असेल, तर ती लोकशाही नाही; तो उघडपणे सत्तेचा गैरवापर आहे.

मुंबईसारख्या देशाच्या आर्थिक राजधानीत असा प्रकार घडतो आणि सत्ताधारी त्याचे प्रदर्शन मिरवत असतील, तर हा केवळ राजकीय अधःपतनाचा नव्हे, तर लोकशाहीच्या निर्लज्जपणाचा कळस आहे. बिनविरोध निवड ही अभिमानाची बाब नाही, विशेषतः ती धमकीतून जन्माला आली असेल तर ती लाजिरवाणी आहे. विजयाचे पोस्टर झडकवताना एकही प्रश्न सत्ताधाऱ्यांनी स्वतःला विचारला का? ही सत्ता मतांनी मिळाली आहे की भयाने? ही निवड जनतेची आहे की गुंडगिरीची? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानात धमकीला जागा नाही; विरोधाला आहे. मतभेदांना आहे, पर्यायांना आहे. पण आज मुंबईत जे घडले, ते संविधानाच्या आत्म्यावर चालवलेले बूट आहे. अशा 'विजयां'मुळे लोकशाही मजबूत होत नाही; ती आतून पोखरली जाते. निवडणूक आयोग, प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांचे मौन हे या दहशतीला दिलेले मूक समर्थन ठरते. आज जर धमकी देऊन उमेदवारी मागे घ्यायला लावली जात असेल, तर उद्या मतदारांनाच मतदानापासून रोखले जाणार नाही, याची काय खात्री ?लोकशाही ही भीतीत जगण्यासाठी नाही, तर निर्भयपणे निवड करण्यासाठी आहे. मुंबईत घडलेला हा प्रकार म्हणजे सत्तेचा विजय नव्हे, तर लोकशाहीचा पराभव आहे. आणि अशा पराभवावर झळकवले जाणारे बॅनर हे विजयाचे नव्हे, तर लोकशाहीच्या मृत्यूचे फलक आहेत.

**प्रवीण बागडे**
**नागपूर**
**मो.क्र. ९९२३६२०९१९**

# तंत्रज्ञानाने जग जवळ आणले, पण माणूस माणसापासून दूर गेला

खरंच,प्रगती एवढी झाली आहे की हजारो किलोमीटर दूर असलेल्या व्यक्तीला बघता-ऐकता येते; आणि अधोगती इतकी झाली आहे की जवळ बसलेल्या माणसाच्या व्यथा-वेदना दिसत नाहीत,ही ओळ आजच्या समाजाचं नेमकं प्रतिबिंब आहे. तंत्रज्ञानाने माणसाला आकाशाएवढं मोठं केलं,पण माणूसपण मात्र हातभर लहान केलं आहे.आपण चंद्रावर पोहोचलो,पण शेजाऱ्याच्या डोळ्यातील अश्रू ओळखायला विसरलो.ही विसंगतीच आजची खरी शोकांतिका आहे.

आज मोबाईलच्या एका क्लिकवर जग हातात आलं आहे. व्हिडिओ कॉलवरून सात समुद्रापलीकडचा चेहरा दिसतो,आवाज ऐकू येतो,भावना व्यक्त होतात.पण याच घरात राहणाऱ्या आई-वडिलांचा थकलेला चेहरा,पत्नीचा दबलेला आवाज,मुलांच्या मनातील भीती मात्र आपल्याला जाणवत नाही.आपण ऑनलाइन आहोत,पण संवेदनशील राहिलो आहोत का,हा प्रश्न अनुत्तरितच आहे.

प्रगती एवढी झाली आहे की कृत्रिम बुद्धिमत्ता माणसासारखी विचार करू




लागली; आणि अधोगती इतकी झाली आहे की माणूसच विचार करायला थांबला. सोशल मीडियावर मतं ओतली जातात,पण समोरच्या माणसाचं ऐकून घेण्याची तयारी उरलेली नाही. एका पोस्टवर हजारो लाईक्स मिळतात,पण गरजूंना दिलेल्या एका आधाराचा रिपोस्ट होत नाही.दान पेटीत टाकलेली मदत कमी झाली,आणि स्टेटसवर दाखवलेली सहानुभूती वाढली.

प्रगती एवढी झाली आहे की वाहनं प्रचंड वेगाने धावतात; आणि अधोगती इतकी झाली आहे की माणसाचं जीवन मूल्य कमी झालं आहे.रस्त्यावर अपघात झाला की लोक थांबून मदत करण्याऐवजी व्हिडिओ काढतात.माणूस पडलेला दिसतो,पण कॅमेऱ्याच्या फ्रेममधून त्याची वेदना बाहेरच राहते.आपण पाहतो,पण स्पर्श करत नाही; ऐकतो,पण समजून घेत नाही, हीच तर संवेदनांची गळचेपी आहे.प्रगती एवढी झाली आहे की उपचार अत्याधुनिक झाले; आणि अधोगती इतकी झाली आहे की आजारपणात माणूस एकटा पडतो.रुग्णालयात यंत्रं आहेत,औषधं आहेत,पण हात धरून धीर देणारी माणसं कमी झाली आहेत.मानसिक आरोग्याची चर्चा होते, पण मानसिक आधार देण्याची तयारी दिसत नाही. सगळं ठीक आहे असं लिहिलेल्या मेसेजमागे लपलेली हतबलता आपण ओळखत नाही.

प्रगती एवढी झाली आहे की शिक्षण सर्वदूर पोहोचलं; आणि अधोगती इतकी झाली आहे की विवेक हरवत चालला आहे. पदव्या वाढल्या,पण संवेदना कमी झाल्या. स्पर्धेत जिंकण्यासाठी सर्वकाही योग्य वाटू लागलं. यशाचं मोजमाप पगाराने होतं,पण माणूस म्हणून आपण किती उंचावलो याचं मोजमाप कुणी करत नाही.मात्र आशेचा किरण अजूनही आहे. कारण माणूस बदलू शकतो.थोडं थांबून पाहिलं, ऐकलं, हात पुढे केला तर ही अधोगती थांबू शकते. शेजाऱ्याला कसं आहे? असा खरा प्रश्न विचारला,घरातल्या माणसाला वेळ दिला,रस्त्यावर पडलेल्या व्यक्तीला मदत केली,निराश मनाला शब्दांचा आधार दिला,तर तंत्रज्ञानाची प्रगती माणुसकीच्या प्रगतीसोबत चालू लागेल.आपण मोठे बदल करू शकत नाही,असं नाही; पण छोटे बदल नक्की करू शकतो. फोन बाजूला ठेवून समोर बसलेल्या माणसाकडे पाहणं, ऐकणं,हेच आजचं खरं मोटिवेशन आहे.कारण जग बदलण्यासाठी आधी आपण बदलायला हवं. प्रगती थांबू नये,पण माणुसकी हरवू नये. तंत्रज्ञान हातात असू दे, पण हृदयात माणूस जिवंत राहू दे.

**रतनकुमार साळवे,९९२३५०२३२०,**
**संपादक दैनिक निळे प्रतिक छत्रपती संभाजी नगर,**

# सावित्री बाई फुले यांची १९४ वी जयंती भांडुप धम्म उपासिका संघ यांनी साजरी केली.

भांडुप- सावित्रीबाई ज्योतिराव फुले (३ जानेवारी १८३१) या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका आणि समाजसुधारक पती ज्योतिराव यांच्यासोबत शिक्षणाचा आणि भारतीय स्त्रीवादाची जननी म्हणून ओळखल्या जातात.



होत्या,ज्यांनी फुले स्त्री पाया घातला त्यांनी १८४८ मध्ये पुण्यातील भिडे वाडा येथे पहिली मुलींची शाळा सुरू केली आणि शिक्षणातून समाजातील अंधश्रद्धा व विषमतेवर मात करण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला,त्यांना क्रांतिज्योती म्हणूनही संबोधले जाते. स्त्रीमुक्तीच्या मुक्तीदात्या सावित्री बाई फुले यांची १९४ जयंती भांडुप धम्म उपासिका संघ यांच्या वतीने धम्म उपासिका चंद्रकला सागर तायडे यांच्या घरी मोठ्या आनंदात साजरी करण्यात आली.त्यावेळी सुनिता उदेभान तायडे,तुळसाबाई गोविंद इंगळे,ज्योती दिलीप थाटे,सुषमा संजय वाकोडे,कोकिळा महादेव बांगर,चंद्रकला सागर तायडे,नंदा शिंदे.यांनी पुष्पहार अर्पण करून पणती प्रज्वलित केली.

# मतदान हा लोकशाहीचा पाया; महिलांनी मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी पुढाकार घ्यावा !

लातूर (प्रतिनिधी): आगामी लातूर शहर




महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी निवडणूक विभागाच्या 'स्वीप' (डतएएझ) कक्षाच्या वतीने विविध उपक्रम राबवले जात आहेत. याच मोहिमेचा भाग म्हणून लातूर शहरातील महिला बचत गटांचा भव्य मेळावा उत्साहात पार पडला. महिलांच्या सक्रिय सहभागातून मतदानाची टक्केवारी वाढवणे हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश होता. मान्यवरांची उपस्थिती आणि मार्गदर्शन-या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयातील विधी समुपदेशक (झउझछउ्ढ) ॲड.अनिता पुंडलिकराव मेखले,मनपा उपायुक्त श्रीम.वसुधा फड आणि शहर अभियंता श्रीम. उषा शिंदे-काकडे यांची उपस्थिती होती.यावेळी बोलताना मान्यवरांनी महिलांच्या सामाजिक आणि राजकीय सहभागावर भर दिला. कुटुंबाची धुरा सांभाळणाऱ्या महिलांनी मतदानाच्या दिवशी घराबाहेर पडून आपला हक्क बजावणे गरजेचे आहे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

आयोजन आणि संकल्प पत्र वितरण-कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन लातूर महानगरपालिकेच्या शिक्षणाधिकारी तथा 'स्वीप' कक्षाच्या नोडल अधिकारी मा. श्रीम. श्र्वेता नागणे यांनी केले होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थित महिलांना आगामी निवडणुकीत शंभर टक्के मतदान करण्याची 'मतदार शपथ' देण्यात आली. तसेच 'मी मतदान करणारच' अशा आशयाच्या संकल्प पत्रांचे वितरणही यावेळी करण्यात आले.अधिकारी व कर्मचाऱ्यांचे योगदान-या मेळाव्यासाठी 'दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियाना'तंर्गत (छणङच्) स्थापन झालेल्या



बचत गटांच्या महिलांनी मोठी गर्दी केली होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शहर अभियान व्यवस्थापक श्री. लक्ष्मण जाधव यांचे मोलाचे सहकार्य लाभले.तसेच समूह संसाधन व्यक्ती (उठझ) श्रीम. मुळे, श्रीम. भालेराव, श्रीम. भालेकर, श्रीम. सोनकांबळे, श्रीम. गोरे, श्रीम. सातपुते, श्रीम. पवार श्रीम. जाधव आणि शहर अभियान व्यवस्थापक श्री. लक्ष्मण जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले. या मेळाव्यामुळे लातूर शहरातील महिला बचत गटांमध्ये मतदानाबाबत मोठी जनजागृती झाली असून, आगामी निवडणुकीत महिलांचा सहभाग लक्षणीय ठरण्याची चिन्हे आहेत.

# भारतीय राजकारणातील गोंधळ!

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २६ नोव्हेंबर १९४९ रोजी एक भाषण केले होते,त्यांचे ते भाषण फार जगप्रसिद्ध आहे.त्यांच्या त्या भाषणाचे शीर्षक होते,त्रीराशी`ष –परीलहू अराजकतेचे व्याकरण यावर त्यांनी ते भाषण दिले होते.आपल्या भाषणात ते म्हणतात, ढीू ीं णपवर्शींीींरपव त्रीरारी`ष रपरीलहू भविष्यातील राजकीय गोंधळाच व्याकरण लोकांनी समजून घेतले पाहिज, स्वतंत्र भारताला त्यांनी शुभेच्छा दिल्या आणि शुभेच्छा सोबतच अनेक इशारे पण दिले. ते म्हणाले, भारताला स्वातंत्र्य तर मिळाले पण ते टिकवणे भारतीयांपुढे खुप मोठे आव्हान आहे.भारतीय लोक हे स्वातंत्र्य टिकवून ठेवतील की नाही ही शंका उपस्थित केली.

भारत हे विकसित लोकशाही राष्ट्र उभे राहावे त्याकरिता डॉ बाबासाहेब आंबेडकर या देशाला संविधान देतात.पण भारतीय लोक लोकशाही प्रणीत घटना शाबूत ठेवतील की नाही अशी शंका पण ते उपस्थित करतात. कारण बाबासाहेबांकडे अफाट विद्वत्तेसोबत अफाट दुरदृष्टी असल्यामुळे त्यांना समजले असावे की इथले राज्यकर्ते राज्यघटनेप्रमाणे कारभार करणार नाहीत.म्हणुन ते म्हणतात.

संविधान कितीही सुंदर असो पण संविधानाप्रमाणे कारभार करणारे चांगले लोक मिळाले नाहीत तर संविधान असफल ठरेल. आणि संविधान कसेही असो त्या संविधानाप्रमाणे कारभार करणारे लोक चांगले मिळाले तर संविधान सफल ठरेल.

आणि बाबासाहेबांनी ज्या गोष्टींचा इशारा दिला होता, तेच घडले कारण गेल्या पंच्याहत्तर वर्षाच्या कालखंडात संविधानाप्रमाणे कुठेही कारभार झाला नाही.संविधानामध्ये प्रत्येक भारतीयांनी देशाप्रती करावयाची काही कर्तव्य दिली आहेत.त्यातील पहिलेच कर्तव्य आहे की संविधानाचेपालन करु, आणि त्याप्रमाणे आम्ही काम करु व संविधानाचा आदर करु. पण दुर्दैवाची गोष्ट म्हणजे संविधानाचे पालन केल्या गेले नाही.त्यातील कर्तव्य समजून घेतले नाही व लोकांना पण ते समजू दिले नाही.

तसेच देशाचा राज्यकर्त्यांनी कसा कारभार करावा त्याबाबत काही मार्गदर्शकतत्वे संविधानात दिली आहेत,पण त्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे राज्यकर्ते वागले नाहीत.जसे विकसित पायाभूत सुविधा शिक्षण,आरोग्य,आणि प्राथमिक शिक्षणच नाही तर तंत्रज्ञानयुक्त शिक्षण,रोजगाराच्या संधी उपलब्ध,औद्योगिक आणि कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर,लोकसंख्यावाढीवर नियंत्रण,राजकीय आणि प्रशासकीय क्षेत्रात भ्रष्टाचारावर आळा, धोरणात्मक निर्णय घेऊन गोरगरीब गरजूंपर्यंत विकासाच्या योजना,बेघराला घर, गरीबी नाहीशी करणे,आत्मनिर्भर भारतासाठी आवश्यक होते.पण कुठेही संविधानानुसार समानता रुजवल्या गेली नाही. संविधानात वाटेल तेवढ्या दुरुस्त्या करुन वाटेल तेवढे नवीन कायदे करुन तसा कारभार केल्या गेला,पण संविधानाप्रमाणे तो केला गेला नाही.पर्यायाने देश विकसित होण्याऐवजी असंख्य समस्याच्या विळख्यात अडकला.आत्मनिर्भर होण्याऐवजी परावलंबी झाला आहे.अशी परिस्थिती आहे.

संविधान देशहित देशातील लोकांचे हित पाहते. हक्क व अधिकाराची जाणीव करुन देते. प्रत्येक व्यक्तीला शिक्षण मिळावे, शिक्षणासोबत रोजगार मिळाला हे सांगते. सामाजिक आर्थिक,राजकीय क्षेत्रातील विषमता नष्ट व्हावी व स्वातंत्र्य,समता,बंधूभाव व न्यायाने जगता यावे हे सांगते. एकता आणि एकात्मता निर्माण करुन देश एकसंघ राहावा हे सांगते, पण संविधानात जे आहे ते आम्हाला भारतीय समाजात दिसत नाही.तर भारतीय समाजात द्वेष,तिरस्कार,घृणा,जातीयवाद,धर्मवाद पाहायला मिळते.कारण गेल्या ६०ते ६५ वर्षात संविधान लोकांच्या हिताचे आहे.असा संविधानाबद्दल लोकांच्या मनात आदर निर्माण केला गेला नाही.उलट त्या संविधानाविषयी आणि संविधान निर्मात्या विषयी भारतीय समाजात द्वेष आणि तिरस्कार पेरला गेला. आणि त्यामुळे कुठे संविधानाची तर कुठे संविधान निर्मात्याची विटंबना होतांना आपल्याला दिसते.हि परिस्थिती चुकीचा राज्यकारभार करणाऱ्या लोकांमुळे झाली.

स्वतंत्र्याचा अमृतमहोत्सव आम्ही साजरा केला पण आजही आमच्या देशात आमच्या मुलांना दर्जेदार स्वरुपाचे शिक्षण नाही.दर्जेदार स्वरुपाच्या शाळा नाहीत.दर्जेदार स्वरुपाचे हास्पिटल नाहीत.दर्जेदार आरोग्य सुविधा नाहीत.जगाच्या यादीत समावेश होईल असे एकही दर्जेदार स्वरुपाचे विद्यापीठ नाही.उच्च शिक्षणाचे प्रमाण फक्त २१% आहे,जगात ते प्रमाण ७० ते ८० % आहे.जगाच्या आम्ही कितीतरी मागे आहोत.जगात टेक्नोलॉजी ने टेक्नोलॉजी चालवली जाते,एवढे प्रगतशील हे देश आहेत.आणि आमच्या देशात अजुन दर्जेदार शिक्षण नाही.रस्ते नाहीत. परदेशातील शेतकरी टेक्नोलॉजी ने शेती करतात, आमच्या देशात शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी धड रस्ता नाही.अशी परिस्थिती आहे.

राजकारणातील व्यक्तीपुजेविषयी ते म्हणतात,व्यक्तीपूजा हि देशाकरिता घातक आहे.कारण देशाचे भवितव्य निर्धारित करताना नेत्यांची प्रतिष्ठा महत्त्वाची नाही.एखादा नेता म्हणजे देश नाही,तर देशाच्या भवितव्याचा विचार हा सर्वतोपरी असावा.पण जर एखादा नेता स्वतःला देशापेक्षा मोठा मानू लागला तर त्या दिवसापासून देशाची वाटचाल अंध:पतनाकडे होईल.हे लक्षात घ्यावे.आणि म्हणून देशात लोकशाही टिकवायची असेल तर, राजकीय लोकशाहीतून सामाजिक लोकशाही निर्माण करण्यासाठी झटले पाहिजे. आर्थिक आणि सामाजिक विषमता असलेली लोकशाही नष्ट करुन, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता असलेली लोकशाही निर्माण केली पाहिजे. स्वातंत्र्य, समता व बंधुता ही तीन तत्वे प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्याची जीवनसत्वे आहेत. कारण स्वातंत्र्याच्या जोडीला समता नसेल, तर स्वातंत्र्य मुठभर लोकांची सत्ता प्रस्थापित करेल, आणि बहुसंख्य लोक वंचित राहतील. समतेच्या जोडीला बंधूभाव नसेल तर समाजात एक दुसऱ्या विषयी आदरभाव न राहता द्वेष आणि तिरस्कार निर्माण होईल. म्हणून स्वातंत्र्याच्या जोडीला समता आणि बंधूभाव असणे गरजेचे आहे. हीं तत्व जर अलग झाली तर लोकशाही धोक्यात येईल. लोकशाहीच्या पतनाला सुरवात होईल.

सध्या महानगर पालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे.त्यामध्ये पहा किती गोंधळ चालू आहे. तिकिट मिळाले नाही म्हणून कोणी अन्नत्याग आंदोलन करत आहेत.कोणी म्हणत आहे मी पक्षाचे एकनिष्ठ पणे काम केले पण मला तिकीट नाही दिले. तर कोणी तिकीट मिळाले नाही म्हणून रडत आहे.कोणी बंडखोरी करताना दिसत आहेत,पक्ष सोडून दुसऱ्या पक्षाचे तिकीटावर निवडणूक लढत आहेत.कोणी त्याने नातलगांना तिकीट दिले म्हणून त्याला थापड मारतांना दिसत आहे.ज्याला त्याला राजकारणातच जावं वाटत आहे.मलाच तिकीट मिळावे आणि मीच निवडून यावे असे वाटत आहे. त्याचे कारण तसेच आहे.भ्रष्टाचारी राज्यकारभार चालवणाऱ्यां लोकांचा आदर्श कार्यकर्त्यांच्या डोळ्यासमोर आहे. की एकदा राजकारणात निवडून आले म्हणजे चार पाच पिढ्यांना पुरेल एवढी संपत्ती कमावल्या जाते.आणि संपत्ती कमावण्याचा अगदी साधा मार्ग,बाकी कोणत्याही क्षेत्रात एवढी कमाई करण्याचा सोपा मार्ग कुठेही नाही. ना अभ्यास करायचे काम,ना मेहनत करायचे काम, ना डोक्याला ताप.म्हणून सगळ्यांचा लोंढा राजकारणात जाण्याचा आहे.

पण स्वच्छ, निर्मळ व भ्रष्टाचारमुक्त राजकारण असते आणि राज्यकारभारात जर पारदर्शक आली असती, त्यामध्ये थोडासाही भ्रष्टाचाराला थारा नसता, आणि निवडून गेलेल्या लोकांनी पाच वर्षे ईमानदारीपूर्वक जनसेवा,व देशहिताचेच काम करावे,त्यामध्ये कोण्या नेत्यांने भ्रष्टाचार केला असे उघडकीस आले तर त्या नेत्याला वीस वर्षे जेल परत निवडणुकीत यायची संधीच नाही.जसे अमेरिका चायना व इतर देशातील राजकारण आहे. असे जर असते तर कोणी एकदम राजकारणात यायची हिम्मत केली नसती. आणि असे गढूळ राजकारण झाले नसते. राजकारणात एवढा गोंधळ ही झाला नसता. असे स्वच्छ राजकारण असते तर राजकारणात एवढी गर्दी पण झाली नसती.

राज्यकारभार करणाऱ्या लोकांनी देशहितापेक्षा स्वहिताला व स्वपक्षाला महत्त्व दिले.स्वतःचे पक्ष वाढवण्यासाठी,मोठे करण्यासाठी राजकारण केले व देशात भयंकर राजकीय गोंधळ निर्माण करुन ठेवला. अशी परिस्थिती आहे. पक्ष तेच आणि लोक पण तेच, पण एका पक्षाचे दोन पक्ष केले.तोच पक्ष घेऊन एक नेता दुसऱ्या नेत्यापासून वेगळा झाला. एक नातलग दुसऱ्या नातलगापासून वेगळा झाला. एक मित्र दुसऱ्या मित्रा पासून वेगळा झाला. पुतण्या काकापासून वेगळा झाला. प्रत्येकाने आपापले पक्ष थाटले,आणि मिडियाच्या माध्यमातून आपापल्या पक्षाचा मोठेपणा दाखवत लोकांना मुर्ख बनवून स्वतः आणि स्वतः चे नातलग मित्र.करोडोची गडगंज संपत्ती साठवण्याचे काम झाले व होत आहे.करत आहेत.अशी भयंकर परिस्थिती आहे.सारेच भ्रष्टाचारी आहेत.आणि याच भ्रष्टाचारी लोकांनी राजकारण पण गढूळ केले आहे. आज देशात गुन्हेगारीचे प्रमाण वाढले,गुंडगिरी वाढली,अन्याय,अत्याचार वाढले,वादविवाद वाढले, लुटारु वाढले, एकीकडे गजगंड संपत्ती तर दुसरीकडे अठराविश्र्व दारिद्र्य अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.भ्रष्ट लोकांच्या हाती जनता सुध्दा सत्ता देत आहे,हेही एक दुर्दैवाची गोष्ट आहे. भ्रष्टाचारी लोक देश चालवत आहेत.ते काय देशहित पाहतील!मुळात हे भ्रष्ट लोकच देशासाठी घातक आहेत.हे जनतेने समजून घ्यावे.आणि अशा लोकांच्या हाती सत्ता देण्यापासून सावध राहावे.

डॉ बाबासाहेब आंबेडकर साधारण नव्हते,ते सृष्टीतील एक अकल्पित साक्षात्कारच होते,की ज्यांची आम्ही कल्पना ही करु शकत नाही!कारण एवढी विद्वत्ता,एवढी दुरदृष्टी,आंतरदृष्टी सामान्य माणसाकडे असूच शकत नाही.ती डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कडे होती. आणि म्हणून आपल्या भाषणात त्यांनी भविष्यातील देशासमोरील धोकादायक चित्र स्पष्ट केले. अनेक इशारे दिले,राज्यकर्ते देशहित न जोपासता देशाला अधोगतीकडेच नेतील, देशात राजकीय बेबंदशाही,

.भयंकर राजकीय गोंधळ व गढूळ राजकारण निर्माण होईल.आणि आज त्यांनी दिलेले इशारे खरे ठरतांना दिसत आहे.आज फक्त देशहित व राष्ट्रहिताच्या गोष्टीच पाहून घ्या, पण वास्तवात सर्व स्वार्थ साधणेच चालू आहे अशी परिस्थिती आहे. राज्यकर्त्यांनी देश बिकट मार्गावर आणुन ठेवला आहे.

**विनोद सरदार**
**फुले आंबेडकर विद्वत सभा**
**मो.नं.९६८९८४७११५**

# शहीद हिराजी पाटील यांना वंदन!



कर्जत शहरातील आमचे मित्र कवी,लेखक,कुणब्याचं पोर चित्रपट निर्माते कोमसाप तालुका अध्यक्ष ॲडव्होकेट ॲड. गोपाळ शेळके हे मागील २५ वर्षापासून ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीत व भारत देश स्वतंत्र झाला पाहिजे म्हणून लढणारे ॲड. कोतवाल, हिराजी पाटील यांच्या २ जानेवारी स्मृती दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करतात जानेवारी २०२५ च्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणा म्हणून मला आमंत्रित करण्यात आले होते, तोपर्यंत त्यांचा इतिहास मला माहीत नसल्याने अलिबागच्या सार्वजनिक वाचनालयात जाऊन या दोन्ही हुतात्म्यांचे जीवन चरित्र वाचून घेतले आणि मैत्री कोणत्या स्तरापर्यंत पोहोचते याची ओळख झाली त्याच बरोबर आपले मित्र कोणत्या स्तरापर्यंत जाऊन गद्दारी करतात याचाही धडा जीवनात मिळाला. आजच १ जानेवारीला सायंकाळी ॲड. गोपाल शेळके,ॲड.संतोष जोहेकर, विकास रणपिसे, मोहिते,निवृत्ती ढाकवळ असे मुरबाड तालुक्यात महाराष्ट्रात प्रसिद्ध जत्रा म्हसा गावाजवळील सिध्दगड येथे जाण्यास निघालो. रस्त्यामधून अनेक वाहने नागरिकांनी भरभरून जात होते ॲड.भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांच्या नावाचा जयघोष करीत निघाले होते सिध्दगडावर पोहोचताच आगरी समाज मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी आमचे स्वागत केले यानंतर समाजाच्या मंडळाने सर्वा साठी शाकाहारी जेवणाची व्यवस्था केली होती,यानंतर आम्ही या दोन्ही शहिदांच्या स्मृतीस्थळाकडे चालत पोहोचलो.तेथे वाहनास बंदी वन खात्याने केली आहे.अतिशय कडाक्याची थंडी होती,शहीदाना नतमस्तक होण्यास २०० दिव्यांग बंधू भगिनी विश्रांतीला बसली होती. स्तंभास वंदन करताना कर्जत पंचायत समितीत कार्यरत असलेले मुरबाड दिव्यांग संघटना पदाधिकारी श्री.शिर्के यांनी मला पाहताच सर्व सभासदांना माझा परिचय करून गुलाब पुष्प देऊन स्वागत केले आणि सुरक्षेबाबत मार्गदर्शन करावे अशी विनंती केली.त्यांना कधीही अपघात प्रसंगी १०८ रुग्णवाहिका चा वापर कायम करावा, महिलानी आपल्या सुरक्षेसाठी काय महाराष्ट्र पोलिसांचा ११२ क्रमांकाचा वापर करावा. आपल्या कोणाही नातेवाईकांच्या मुलींच्या बाळंतपणासाठी १०२ रुग्णवाहिकेचा वापर करावा असे सांगितले तिथून निघताना ॲड.कोतवाल आणि हिराजी पाटील यांना ब्रिटिशांनी गोळ्या घातल्या त्या ठिकाणी नतमस्तक होण्यास पोहोचलो.ॲड.गोपाळ शेळके यांनी तेथील माती सोबत रुमालात पहाटेच्या कर्जत येथील कार्यक्रमास पूजन करण्यासाठी घेतली.याच ठिकाणी जेवणाच्या सामानाची रसद आणावयास खालील गावातील पोलीस पाटलाकडे त्यांच्यातील एका मित्राला ॲड.कोतवालानी चिठ्ठी दिली त्यांच्यावर लावलेल्या रोख बक्षिसाच्या लालसे पोटी खाली पोलीस ठाण्यात पोहोचून सर्व जणांची माहिती दिली आणि गद्दारी केली.पुन्हा पोहोचताच ॲड. कोतवाल यांना त्यांनी सांगितले की पोलीस माझे पाठलाग करीत होते. परिस्थितीचा अंदाज करून ॲड. कोतवाल यांनी सर्व सहकाऱ्यांना घराकडे निघून जाण्यास विनंती केली, मात्र हिराजी पाटील म्हणाले मित्राला अशा परिस्थितीत सोडून जाणे हे मला योग्य वाटत नाही मी राहणारच आणि पहाटे ६ वाजून दोन मिनिटांनी पोलिसांनी या दोघांना घेरले आणि गोळ्यांचा वर्षाव केला आणि हे दोघे देशासाठी शहीद झाले.हे सर्व ऐकून अंगावर काटे आले तेथून कार्यक्रम स्थळी येताच आगरी समाज मंडळाच्या सचिवांनी अलिबाग होऊन प्रा.डॉ.जयपाल पाटील आपत्ती व्यवस्थापन तज्ञ, सोबत ॲड. गोपाल शेळके व ड.संतोष जोहेकर यांनी व्यासपीठावर यावं असं घोषणा करताच आम्ही व्यासपीठावर पोहोचलो आमचा त्यांनी सन्मान केला,रात्रीचे २ वाजले होते, या दोन्ही शहिदांबद्दल गौरवपूर्ण इतिहासाची पाने ऊलगडली आणी जमलेल्या ३००० जनसमुदयास ज्या मध्ये शाळा,महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात असल्याने आपण सुरक्षित कसे राहायचे याबद्दल महाराष्ट्र पोलिसांचा११२क्रमांक, महिला व मुली सुरक्षेसाठी,महाराष्ट्र शासन आरोग्य केंद्रातील महिलांना बाळंतपणासाठी १०२ रुग्णवाहिका व बीव्हीजी कंपनीची मोफत सर्वांसाठी अपघाताच्या वेळी १०८ रुग्णवाहिकेचा वापर आपत्तीत करा असे मार्गदर्शन केले.आणि अलिबाग तालुक्यातील नागरिकांना शहिदांची माहिती व्हावी यासाठी शाळा कॉलेजच्या विद्यार्थ्यांना निबंध स्पर्धेचे आयोजन करून त्यांना वंदन करण्याची सुरुवात करीत आहे. उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. कार्यक्रमासाठी आदर्श पतसंस्थेच्या चे संस्थापक चेअरमन श्री.सुरेश पाटील यांनी बँकेचे अद्यावत सभागृह मोफत दिले आहे,रायगडातील शहीदानां वंदन करण्याची महुर्त मेढ रायगड चा युवक फाऊंडेशन ने अलिबागेत रोवली आहे.भारत माताकी जय!

# भीमा कोरेगाव शौर्यदिनाच्या निमित्ताने सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट वायरल करुन जातीय तेढ निर्माण करणाऱ्या विरुद्ध ट्रॉसिटी क्ट अनुसार गुन्हा दाखल करण्यात यावा




केज/प्रतिनिधी-भीमा कोरेगावच्या शौर्यदिनाच्या निमित्ताने व्हाट्सअप स्टेटसला व इंस्टाग्राम या सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट वायरल करून जातीय तेढ निर्माण करणाऱ्या विरुद्ध ट्रॉसिटी क्ट अनुसार गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांच्याकडे दलित चळवळीतील सर्व सामाजिक संघटना व पक्षाचे पदाधिकारी,कार्यकर्ते यांनी केली आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील चिंचोली माळी या गावातील रोहन गलांडे नावाच्या व्यक्तीने काल दि.३ जानेवारी २०२६ रोजी स्वतःच्या व्हाट्सअपला स्टेटस ठेवून व इंस्टाग्राम या सोशल मीडियावर भीमा कोरेगाव येथील शौर्य दिनाच्या निमित्ताने शूरवीरांच्या बाबत त्यांनी आक्षेपार्ह पोस्ट वायरल केली आहे.

त्यामुळे दोन समाजात तेढ निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्था धोक्यात येऊ शकते. तसेच सदर इसम हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा, समाजा-समाजात तेढ निर्माण करणाऱ्या वृत्तीचा व सराईत आहे.

तरी संबंधितावर माहिती तंत्रज्ञान अधिनियम आणि जातीय तेढ निर्माण करून मागासवर्गीय शूरवीरांचा अवमान केला. तसेच त्याला भीमा कोरेगाव येथील शूरवीर हे मागासवर्गीय समाजाचे असल्याची जाण असल्याची आणि सदर आक्षेपार्ह पोस्ट करणारा हा सुशिक्षित असल्याने त्याला सर्व बाबीची माहिती असताना देखील त्यांनी खोडसाळपणे, जाणुनबुजून व जातीय भावनेने प्रेरित होऊन सदर पोस्ट व्हायरल केल्याप्रकरणी त्याच्यावर अनुसूचित जाती-जमाती कायद्याअंतर्गत कठोर कारवाई करण्यात यावी. अशी मागणी दलित चळवळीतील सर्व संघटना व पक्षाचे पदाधिकारी,कार्यकर्ते आणि समाज बांधवांनी केली आहे.

या निवेदनावर योगेश गायकवाड, बाळासाहेब ओव्हाळ, चंद्रकांत खरात सर, बबलू साखरे, लखन हजारे, अशोक गायकवाड, तात्या गवळी, गौतम बचुटे, पांडुरंग जोगदंड, बाबुराव गालफाडे, लिंबराज गायकवाड, समाधान बचुटे, अमोल मस्के, प्रवीण मस्के इत्यादींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

सदर मागणीचे निवेदन हे केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांनी स्वीकारले.

सदर प्रकरणाचा पुढील तपास हा पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुकुमार बनसोडे हे करत आहेत. सदर प्रकरणी पोलीस प्रशासन काय कारवाई करणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे व ते पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

आमच्या शूरवीरांच्या बाबत आक्षेपार्ह पोस्ट वायरल करून जातीय तेढ निर्माण करणाऱ्या विरुद्ध तात्काळ ट्रॉसिटी क्ट अनुसार गुन्हा दाखल करून संबंधित दोषीला तात्काळ अटक करण्यात यावी. आमचे पूर्वज शूरवीर यांच्या विषयी आक्षेपार्ह पोस्ट करून सोशल मीडियावर वायरल करुन आमच्या आदर्शांचा अवमान केल्यामुळे आमच्या दलित समाज बांधवांच्या भावना दुखवल्या आहेत. त्याकरिता संबंधित दोषीवर तात्काळ कठोरात कठोर कारवाई करून अटक करण्यात यावी. तसेच सदर प्रकरणातील मुख्य सूत्रधार कोण आहे. व संबंधितांना पडद्याआडून कोण पाठिंबा देत आहे. याचीही सखोल चौकशी करण्यात यावी.जर पोलीस प्रशासनाने संबंधित दोषीवर गुन्हा दाखल करून अटक केली नाही. तर तीव्र व उग्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा प्रशासनाला माध्यमांशी बोलताना दलित चळवळीतील कार्यकर्त्यांनी दिला आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संघाच्या शाखास्थानी आल्याच्या स्मरणार्थ बंधुता परिषद संपन्न




लातूर : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दि.२ जाने. १९४० रोजी कराड जि. सातारा येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखास्थानी आले होते. त्या घटनेच्या स्मरणार्थ लातूर शहरात लोकसेवा मंडळातर्फे भालचंद्र ब्लड बँक याठिकाणी बंधुता परिषद घेण्यात आली.

या परिषदेत प्रमुख वक्ते प्रा. बालाजी कळंबे तसेच विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरणाचे सदस्य मिलींद बिलोलीकर यांची उपस्थिती होती. तर प्रमुख पाहुणे म्हणून जगदीश तोष्णीवाल, संजय कांबळे उपस्थित होते. यावेळी बोलताना प्रा. कळंबे यांनी प्रथमतः राष्ट्र... म्हणणाऱ्या डॉ. आंबेडकरांनी संपूर्ण आयुष्य या देशाच्या कल्याणासाठी, गोर – गरीबांच्या उद्धारासाठी वाहिले. प्रत्येक जागरूक व्यक्तीने त्याचा विसर पडू न देता पुढील पिढीला जागृत करावे असे विचार व्यक्त केले. त्याची प्रसिद्धी डॉ. आंबेडकरांच्या तत्कालीन साप्ताहिक जनता व दै. केसरी मध्ये करण्यात आली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महनीय कार्यावरही त्यांनी प्रकाश टाकला. मिलिंद बिलोलीकर यांनी आपल्या मार्गदर्शनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मतभेद असून सुद्धा मी संघाकडे आपलेपणाने पाहतो. काही जरूर लागेल त्याप्रसंगी मदत करण्याचे आश्र्वासन दिल्याची आठवण करून दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे इतरांच्या विचारांचा सन्मान करत, संवाद करत. डॉ. हेडगेवार यांनी सुद्धा एकता आणि बंधुता हेच ध्येय ठेऊन संघाची स्थापना केली होती आणि १०० वर्षांपासून संघाचे स्वयंसेवक तेच ध्येय डोळ्यासमोर ठेवून राष्ट्रीय एकात्मतेसाठी अविरत कार्य करत आहेत. असे महापुरुष आम्हाला लाभले हे आपले सर्वांचे भाग्य आहे,असे असा विचारही मिलिंद बिलोलीकर यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमात राज्य शासनाचे पुरस्कार प्राप्त कार्यकर्ते वाघमारे, चव्हाण, कांबळे, विराळे यांचाही सत्कार करण्यात आला. तसेच संघाचे स्वयंसेवक, महीला व विद्यार्थी, मोठ्या संख्येने उपस्थितीत राहीले. सौ संगीता ताई शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवाजी चौरे यांनी केले. डॉ. संतोष जमदाडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

# दृष्टी दिव्यांगानी कला कौशल्य विकसित करावी–डॉ. विजयभाऊ राठी




लातूर –लुई ब्रेल यांनी दृष्टी दिव्यांगासाठी सहा टिंबाची ब्रेल लिपी शोधून काढली आणि त्यांच्या ज्ञानाची द्वारे खुली केली. ब्रेल लिपीच्या माध्यमातून दृष्टी दिव्यांगाच्या जीवनामध्ये नवसंजीवनी निर्माण झाली. त्यामुळेच आज दृष्टी दिव्यांग व्यक्ती आपला शैक्षणिक विकास साध्य करीत आहे परंतू शिक्षणासोबत आपल्यामधील कला कौशल्यांना सुद्धा विकसित करणे आवशयक असल्याचे प्रतिपादन नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड, लातूर शाखेचे अध्यक्ष तथा रोटरीचे माजी प्रांतपाल डॉ. विजयभाऊ राठी यांनी केले.

बियांड़ व्हिजन फाउंडेशन, रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२, नॅशनल असोसिएशन फॉर दि ब्लाइंड, लातूर शाखा, अंधजन विकास मंडळ, लातूर, रोटरी सॅटेलाईट क्लब ऑफ लातूर मिडटावून आदिशक्ती आणि लातूर अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक, लि. यांच्यावतीने विश्र्व ब्रेल दिनाचे औचित्य साधून दि. ०२ ते ०४ जानेवारी २०२६ या कालावधीमध्ये लातूर येथे दृष्टी दिव्यांगांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी ब्रेल महोत्सव २०२६चे आयोजन करण्यात आले होते यामध्ये ते मार्गदर्शन करीत होते.

यावेळी विचार मंचावर प्रोफेसर डॉ. संजय गवई, वसंत हेगडे (मुंबई), अंधजन विकास मंडळाचे उपाध्यक्ष सुधाकर घारापुरकर, लेखक दिनेश महाजन, रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझनचे अध्यक्ष डॉ. गुणवंत बिरादार, बियांड़ व्हिजन फाउंडेशचे अध्यक्ष डॉ. माधव गोरे, संदीप चोपडे, मीरा चोपडे आणि अमोल निलंगेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी लुई ब्रेल यांच्या प्रतिमेला अभिवादन करून दीप प्रज्वलन करण्यात आले आणि शासकीय अंधशाळेच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले. तसेच दिनेश महाजन यांच्या जन्मदिनानिमित्त केक कापून त्यांना हार्दिक शुभेच्छा सुद्धा देण्यात आल्या.

पुढे बोलताना डॉ. विजयभाऊ राठी म्हणाले की, दृष्टी दिव्यांग व्यक्तींना स्मार्ट स्टिक्सचे प्रशिक्षण देऊन प्रशिक्षण देण्याचे कार्य नॅब तर्फे केले जाईल. तसेच सध्या महिलांमध्ये कॅन्सरचे वाढते प्रमाण यासाठी सुद्धा शिबिराचे आयोजन केले जाईल याचा सर्वांनी लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

यावेळी प्रोफेसर डॉ. संजय गवई म्हणाले की, लातूरमध्ये ब्रेल महोत्सव २०२६चे आयोजन बियांड़ व्हिजन फाउंडेशन तर्फे केले जात आहे. ही दिव्यांग दृष्टी बाधितांसाठी अत्यंत भूषनावह बाब आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून आपल्या मधील कौशल्याच्या सादरीकरणाला संधी आणि प्रोत्साहन मिळणार आहे त्यामुळे या महोत्सवामध्ये आपण सक्रिय सहभागी होऊन त्याचा लाभ घेतला पाहिजे असेही ते म्हणाले.

यावेळी वसंत हेगडे, सुधाकर घारापुरकर आणि दिनेश महाजन यांनीही आपापली मनोगत व्यक्त केली.

काल ऑनलाईन झालेल्या राज्यस्तरीय ब्रेल वाचन आणि आजच्या सुगम संगीत स्पर्धेत महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नांदेड, लातूर, अमरावती, यवतमाळ, नागपूर, सोलापूर, हिंगोली, धाराशिव, गडचिरोली आणि कोल्हापूर आदी विविध जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात स्पर्धक सहभागी झाले आहेत.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. माधव गोरे यांनी केले, सूत्रसंचालन मीरा चोपडे हीने तर आभार तुकाराम जाधव यांनी मानले.

उद्या स्पर्धेचा समारोप आणि बक्षीस वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष शिक्षिका पद्मा धाबेकर, सत्यवान जोगदंड, किशोर ससाने, भोलेनाथ चव्हाण, अनिता महाजन, वृषाली महाजन, मृणाली महाजन, राहुल गोदाम, मुकुंद कुलकर्णी आणि सुमित भडके यांनी परिश्रम घेतले

# संतोष भिसे यांना पीएच.डी.पदवी



लातूर : दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या संशोधन केंद्रातील आणि अहमदपूर येथील महात्मा गांधी महाविद्यालय येथे गेल्या १५ वर्षांपासून सहाय्यक शिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या संतोष लक्ष्मण भिसे यांना नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने भौतिकशास्त्र या विषयात पीएच.डी. पदवी प्रदान केलेली आहे.त्यांनी दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र विभागातील प्रा.डॉ.विश्र्वनाथ मोटे यांच्या मार्गदर्शनाखाली सिंथेसिस, कॅरेक्टररायझेशन ऑफ झिंक आणि मॅन्गनीज कापर ऑक्साईड थीन फिल्म्स या विषयावर विद्यापीठात शोध प्रबंध सादर केलेला होता.

या संशोधनामध्ये मॅंगनीज व झिंक डोप्ड कॉपर ऑक्साईड थिन फिल्म्सच्या निर्मिती व त्यांच्या संरचनात्मक तसेच संवेदन गुणधर्मांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे.याशिवाय या संशोधनाचा मुख्य उपयोग बेंझीन व फॉर्माल्डिहाइड यासारख्या विषारी वाष्पशील सेंद्रिय संयुग वायूंचे संवेदन करण्यासाठी असून,हे संशोधन औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषण नियंत्रण,कामगारांच्या आरोग्य संरक्षण व पर्यावरण सुरक्षेसाठी अत्यंत उपयुक्त ठरणारे आहे.

संतोष भिसे यांनी आतापर्यंत ३ शोधनिबंध प्रकाशित केले असून २ शोधनिबंध प्रकाशनासाठी संवादित केले आहेत.तसेच त्यांनी २ राष्ट्रीय व १ आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभाग घेतला असून,शारदा एज्युकेशन सोसायटी,बारामती येथे आयोजित परिषदेत आपले संशोधन सादर केले आहे.त्यांच्या या शैक्षणिक संशोधनाबद्दल महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांनी त्यांचा सत्कार केला.याप्रसंगी आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख कॅप्टन डॉ.विजेंद्र चौधरी,नॅक समन्वयक डॉ.शंकर बिराजदार, इलेक्ट्रॉनिक्स विभाग प्रमुख डॉ.टी.एच.मुजावर, डॉ.एम.बरोटे, डॉ.सी. टी. लोंढे, डॉ. संध्या जाधव, डॉ.श्र्वेता लोखंडे,प्रा.मेघा आत्राम, प्रा.विजयकुमार मांदळे यांच्यासह इतर प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

# लोकविज्ञान दिनदर्शिका सामान्य ज्ञानात मोलाची भर घालतेय : अतुल देऊळगावकर

लातूर : नव्या वर्षाच्या प्रारंभी अनेक नामांकित दिनदर्शिका उपलब्ध करून दिल्या जातात. मात्र या सगळ्यांमध्ये लोकविज्ञान दिनदर्शिका विद्यार्थ्यांसह संपूर्ण कुटुंबाच्या ज्ञानात मोलाची भर घालण्याचे काम करते. असे मत ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ अतुल देऊळगावकर यांनी व्यक्त केले आहे.मागच्या सलग ३७ वर्षांपासून विज्ञान आपल्या संस्कृतीचा भाग व्हावा, वैज्ञानिक विचार पद्धती व वैज्ञानिक दृष्टीकोन समाजात रुजायला हवा, या उद्देशाने प्रतिवर्षी ही दिनदर्शिका प्रकाशित केली जाते. दरवर्षी वेगवेगळे विषय घेऊन येणारी ही दिनदर्शिका यावर्षी ' आपल्या शहरांचे बकालीकरण : लोकविज्ञान पर्याय ' हा विषय घेऊन प्रकाशित करण्यात आली आहे. या दिनदर्शिकेच्या प्रत्येक पानावर जागतिक पातळीवरील ख्यातनाम शास्त्रज्ञ – पर्यावरण तज्ज्ञांच्या जीवन कार्याचा थोडक्यात परिचय करून देण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक महिन्यातील विज्ञान दिनाचे महत्वही विशद करण्यात आले आहे. तसेच प्रत्येक महिन्यातील तारांगणाच्या तारखाही देण्यात आलेल्या आहेत. या दिनदर्शिकेमुळे विद्यार्थ्यांसोबतच परिवारातील सर्वांच्या ज्ञानात भर पडणार आहे. प्रत्येकाला विज्ञानाची खऱ्या अर्थाने जवळून ओळख होण्यासही मदत मिळणार असल्याचे अतुल देऊळगावकर यांनी सांगितले. जगातील खगोलशास्त्रज्ञ, जीवशास्त्रज्ञ, रसायनशास्त्रज्ञ, भौतिकशास्त्रज्ञ, गणितज्ञ, निसर्गतज्ञ, वास्तू विशारद आदींच्या कार्याची संक्षिप्त माहिती, त्यांनी लावलेल्या शोधांविषयीही थोडक्यात माहिती देण्यात आलेली आहे. खऱ्या अर्थाने ही दिनदर्शिका परिवारातील प्रत्येक सदस्यांच्या ज्ञानात कमालीची भर घालण्याचे काम करणार असल्याचे मतही अतुल देऊळगावकर यांनी व्यक्त केले.

# राष्ट्रीय कृत्रिम दंत रोपण परिषदेत एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील डॉ. सागरिका मिसाळ, डॉ. यश भिकाणे, डॉ योगिनी शेंडे, डॉ श्र्वेता मिश्रा व डॉ. मोनिका बागेश्र्वर संशोधनास प्रथम पुरस्कार



लातूर, – इंडियन प्रोस्थोडोंटिक सोसायटी (खझड) च्या वतीने नुकत्याच घेण्यात आलेल्या ५३ व्या राष्ट्रीय प्रोस्थोडोंटिक परिषदेत एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील कृत्रिम दंत रोपण विभागातील एम.डी.एस. पदव्युत्तर विद्यार्थी डॉ.सागरिका मिसाळ, डॉ यश भिकाणे, डॉ योगिनी शेंडे, डॉ श्र्वेता मिश्रा व डॉ. मोनिका बागेश्र्वर यांच्या संशोधनास प्रथम पारितोषिक मिळाले आहे. या यशाबद्दल एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांच्या हस्ते सर्व विजेत्या संशोधकांचा गौरव करण्यात आला.

मुंबई येथे पार पडलेल्या तीन राष्ट्रीय प्रोस्थोडोंटिक परिषदेत दुसऱ्या दिवशी दुसऱ्या सत्रात डॉ.सागरिका मिसाळ, डॉ यश भिकाणे, डॉ योगिनी शेंडे व डॉ श्र्वेता मिश्रा यांनी सूक्ष्म सेन्सर द्वारे दंतहीन रुग्णांमध्ये सेंट्रिक रिलेशन नोंदवणे या विषयावर सादर केलेल्या संशोधनास प्रथम पारितोषिक मिळाले तर डॉ मोनिका बागेश्र्वर यांनी तत्काळ इम्प्लांट बसवण्याच्या संदर्भात अल्व्हिओलर हाडाची मापे व नाकाच्या हाडा जवळील विस्ताराचे उइउढ–आधारित विश्र्लेषण या विषयावर सादर केलेल्या शोध निबंधासही प्रथम पारितोषिक मिळाले आहे.

या परिषदेत विविध शैक्षणिक व्याख्याने, थेट प्रात्यक्षिक, रिसर्च पेपर, रिसर्च पोस्टर व टेबल क्लिनिक अशा स्पर्धक उपक्रमांचा समावेश होता.

विजेत्या सर्व संशोधकांचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. या परिषदेत एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील कृत्रिम दंत रोपण विभागातील एम.डी. एस. पदव्युत्तर विद्यार्थी डॉ. अभिषेक गोले, डॉ. मयूर तुपटे, डॉ. योगेश्र्वरी भिसे, डॉ. प्रशंसा वैकुंठे, डॉ. अद्वैता आवाळे, डॉ. अक्षय मुचाटे, डॉ. श्रेयस मगर, डॉ. समर्थ रेवडकरी, डॉ. प्रशांत घोगरे, डॉ. वेदिका देशमुख यांच्यासह देशभरातील अनेक प्रख्यात प्रोस्थोडोंटिस्ट यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

या यशाबद्दल सर्व विजेत्या संशोधकांचे एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, उप प्राचार्य डॉ यतिशकुमार जोशी, प्रोसथोडोंटिक्स विभाग प्रमुख डॉ. सुशैन गाजरे, डॉ. भूषण बांगर, डॉ. शशी पाटील, डॉ. शीतल वाघ, डॉ. विद्या वायबसे, डॉ. योगेश नागरगोजे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांकडून अभिनंदन होत आहे.

# हारूणभाई इनामदार यांच्या वाढदिवसानिमित्त होळ येथे शालेय साहित्य वाटप;ड. राजेश भैय्या शिंदे यांचा स्तुत्य उपक्रम



केज/प्रतिनिधी–जनविकास परिवर्तन आघाडीचे सर्वेसर्वा तथा हारूणभाई इनामदार यांच्या वाढदिवसानिमित्त होळ येथे सामाजिक बांधिलकी जपत शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचे आयोजन ड.राजेश भैय्या शिंदे यांच्या पुढाकाराने करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, होळ येथील विद्यार्थ्यांना वह्या, पेन, इत्यादी शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. शिक्षणाच्या प्रवाहात कोणतीही अडचण येऊ नये, तसेच विद्यार्थ्यांना शिकण्याची गोडी लागावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे ड. राजेश शिंदे यांनी सांगितले.

कार्यक्रमादरम्यान इयत्ता चौथीतील स्कॉलरशिप परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यास डव्होकेट राजेश शिंदे यांच्या हस्ते विशेष बक्षीस देऊन गौरविण्यात येणार आहे. या सन्मानामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

या कार्यक्रमास जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक इंगळे सर, होळ गावचे माजी सरपंच नवनाथ घुगे, आदर्श तलाठी लक्ष्मण तात्या राख, डव्होकेट राजेश शिंदे, मेजर शरद नारायणराव पवार, प्रेम भैय्या शिंदे, कांबळे भैया, अंगद राख सर यांच्यासह सर्व शिक्षकवृंद, शाळेचे कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

सामाजिक जाणीव जपत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस हातभार लावणारा हा उपक्रम कौतुकास्पद असून, माननीय हारूणभाई इनामदार यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर – ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर – ४१३५१२ येथे प्रकाशित केले.